सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे

दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे - १

दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID :dlrmah.mah@nic.in Web site :https://mahabhumi.gov.in

---

क्र/ रा.भू.अ.आ.का.५/ स्वामित्व योजना/का.वि.५१२/२०२३ पुणे दिनांक २२/११/२०२३

प्रति,
उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व)

विषय:-चौकशी करतेवेळी धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडीघेणेबाबत.
संदर्भ:-ग्राम विकास विभागागाकडील शासन परिपत्र क्रमांक गाजप्र-२०१९/प्र.क्र.१३६/पंरा-४ दि २१/०१/२०२०

उपरोक्त विषयांकीत कामी सादर करणेत येते की, महाराष्ट्र राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प स्वामित्व योजना प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार सर्वेक्षण व चौकशी काम करण्यात येते.संदर्भीय शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.३.१.१.२ व ३.१.१.३ नुसार ग्रामसेवकांनी गावातील, गावठाणातील सर्व मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी प्राप्त करून घेणे आवश्यक आहे असे सुचित केले आहे. राज्य शासनाकडून व केंद्र शासनाकडून केंद्र शासनाच्या योजनांतर्गत निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची नांवे, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी यांची माहिती वेळोवेळी मागणी करण्यात येते.

तरी सर्व चौकशी अधिकारी यांनी स्वामित्व योजनेअंतर्गत गावातील, गावठाणातील सर्व मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी ग्रामसेवक यांचेकडून प्राप्त करून Mahasvamitva Information System (MSIS) अज्ञावलीमध्ये चौकशी नोंदवहीत भरण्यात यावेत. वरील बाबत आपलेस्तरावरून संबधीत उप अधीक्षक भूमि अभिलेख, चौकशी अधिकारी यांना कळविणेत यावे.

Signed by
Niranjan Kumar Sudhansu
Date: 24-11-2023 19:37:58
(एन.के. सुधांशु)
जमाबंदी आयुक्त आणिसंचालक
भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे